# प्रतिभा महाविद्यालयाने केला सायबर जनजागृती करार

**चिंचवड, दि. ३० (वार्ताहर) -** चिंचवड येथील कमला शिक्षण संकुलाचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली क्विकहिल फाउंडेशन व प्रतिभा महाविद्यालय यांच्यामध्ये सायबर जनजागृती विषयक प्रकल्पाचा करार करण्यात आला. सायबर सुरक्षा हे आजच्या काळातील एक अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे. इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे सायबर गुन्ह्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा हा प्रत्ये ासाठी अत्यावश्यक विषय बनला आहे.



या प्रकल्पाद्वारे नागरिकांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्याचे उपाय शिकवले जातील. या प्रकल्पाचा उद्देश नागरिकांना सायबर धोके ओळखण्याचे, त्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, हे शिकविणे आहे. या अंतर्गत विविध कार्यशाळा, सेमिनार आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.

महाविद्यालयातील प्रथम तसेच द्वितीय वर्षाचे विद्यार्थी या प्रकल्पाद्वारे परिसरातील विविध शाळा, महाविद्यालये तसेच सार्वजनिक ठिकाणी जाऊन सायबर गुन्हे आणि उपाययोजना यांबद्दल माहिती देण्यासाठी स्वतंत्र सायबर क्लबची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयाच्या वतीने दिपू सिंह, बतूल परावाला, संकेत पवार तसेच ऑलिव्ह विजू या विद्यार्थ्यांची विविध पदांवर निवड झाली. त्यांचे स्वागत प्राचार्य डॉ.अरुणकुमार वाळूंज, मुख्यप्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी केले.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सायबर जनजागृती केली. विद्यार्थी अभिलाषा चितकोटे व संकेत पवार यांनी एन.एस.एस. तर्फे स्वयंसेवक म्हणून वारीमध्ये सहभाग घेतला. डॉ. हर्षिता वाच्छानी, प्रा. सुप्रिया गायकवाड, प्रा. उज्वला फलक यांचे मार्गदर्शन लाभले.